International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा अभ्यास

**देशमुख शीतल दिलीपराव**, संशोधक विद्यार्थिनी, शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
**डॉ. सूर्यवंशी वैशाली पुंजाराम,** संशोधन मार्गदर्शक, शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**सारांश**

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास हा त्यांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक यशाचा मूलभूत घटक आहे. आत्मविश्वासामुळे विद्यार्थी अभ्यासात अधिक सक्रिय, जिज्ञासू आणि प्रयत्नशील बनतात. हे त्यांच्या निर्णयक्षमता, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सामाजिक संवाद कौशल्ये सुधारण्यात मदत करते. आत्मविश्वास विद्यार्थ्यांना आव्हाने स्वीकारण्यास, चुका आत्मविश्वासाने हाताळण्यास आणि नवीन अनुभव व प्रयोग करण्यास सक्षम करतो. त्यामुळे विद्यार्थी केवळ ज्ञान प्राप्त करत नाहीत, तर स्वावलंबी, जबाबदार आणि मानसिकदृष्ट्या सक्षम होतात. शिक्षक, पालक आणि शाळेची संयुक्त जबाबदारी आहे की विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि संधी उपलब्ध करून द्याव्यात. या दृष्टिकोनातून, माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा अभ्यास त्यांच्या शैक्षणिक संपादनासंबंधी अंतर्दृष्टी देतो आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतो.

**प्रस्तावना:**

माध्यमिक स्तर हा विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यातील विद्यार्थी प्रामुख्याने कुमारावस्थेत (वय १२ ते १६ वर्षे) असतात, जेव्हा शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक बदल झपाट्याने घडतात. या काळात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास विकसित होणे आणि शैक्षणिक संपादन वाढवणे हे शिक्षण प्रक्रियेचे मुख्य उद्दिष्ट मानले जाते.

आत्मविश्वास म्हणजे व्यक्तीच्या स्वतःच्या क्षमतेवर, ज्ञानावर आणि कृतीवर असलेला दृढ विश्वास. आत्मविश्वास असलेला विद्यार्थी शिक्षणात अधिक सक्रिय, जिज्ञासू आणि समस्यांचे निराकरण करण्यास सक्षम ठरतो. दुसरीकडे, आत्मविश्वासाचा अभाव असलेला विद्यार्थी भीती, असुरक्षितता आणि अपयशाच्या मानसिकतेत अडकतो.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान आणि मूल्याधिष्ठित समाजात शिक्षण केवळ ज्ञान देण्याचे साधन राहिलेले नाही, तर व्यक्तिमत्त्व विकासाचे माध्यम बनले आहे. म्हणूनच शिक्षक, पालक आणि शाळेची संयुक्त जबाबदारी आहे की ते विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतील आणि त्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी योग्य दिशा देतील.

या पार्श्वभूमीवर माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि त्यांचे शैक्षणिक संपादन यांच्यातील परस्परसंबंध समजून घेणे आवश्यक ठरले, आणि म्हणूनच हा संशोधन अभ्यास करण्यात आला.

**माध्यमिक स्तर (Secondary Level)**

IJARMT
International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

माध्यमिक स्तर हा विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा आणि घडणारा टप्पा मानला जातो. या स्तरावरील विद्यार्थी प्रामुख्याने कुमारावस्थेत (वय १२ ते १६ वर्षे) असतात. या अवस्थेत विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक परिवर्तन वेगाने घडत असते, ज्याचा त्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेवर आणि वर्तनावर लक्षणीय परिणाम होतो. या टप्प्यावर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास विकसित करणे आणि शैक्षणिक संपादन वृद्धिंगत करणे ही शिक्षण प्रक्रियेची प्रमुख उद्दिष्टे ठरतात. आत्मविश्वासाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या क्षमतांची जाणीव करून घेतो, आव्हाने स्वीकारण्याची वृत्ती विकसित करतो आणि यश संपादनासाठी प्रयत्नशील राहतो. आत्मविश्वासपूर्ण विद्यार्थी समस्यांचे निराकरण, तर्कशुद्ध निर्णय घेणे तसेच शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात प्रगती करणे यासाठी अधिक सक्षम ठरतात.

माध्यमिक स्तरावरील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा केवळ ज्ञानविकास न होता त्यांचा आत्मविश्वास, स्वावलंबन, जवाबदारीची भावना आणि सकारात्मक वृत्ती यांचाही विकास साधला जातो. त्यामुळे या स्तरावर शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाच्या वृद्धीसाठी योग्य शैक्षणिक वातावरण, प्रोत्साहन आणि मार्गदर्शन प्रदान करणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांची शैक्षणिक तसेच वैयक्तिक प्रगती सुनिश्चित होईल.

**आत्मविश्वास (Confidence):**

आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली आहे जीवनात कुठलीही गोष्ट करायची असेल तर त्यासाठी आत्मविश्वास सगळ्यात महत्त्वाचा असतो. आत्मविश्वास हा घटक व्यक्तिमत्त्वाचा एक भाग आहे. एखादी गोष्ट मी करू शकतो हा विश्वास म्हणजे आत्मविश्वास." आत्मविश्वास म्हणजे आपली क्षमता, मर्यादा लक्षात घेऊन कामे करणे, लहान सहान गोष्टींसाठी विचलित न होणे, स्वतःची तुलना स्वतःशीच करणे, हाती घेतलेले काम मनापासून पूर्ण करणे होय.

कोणतीही संधी मिळवण्यासाठी आत्मविश्वासाची खूप आवश्यकता असते. आणि जर आत्मविश्वासच नसेल तर संधीही अशाच वाया जातात. म्हणून आत्मविश्वास हा घटक खूप महत्त्वाचा समजला जातो. आत्मविश्वास म्हणजे परिस्थिती संयमाने हाताळण्याची व त्यातून यश अथवा अनुकूलता प्राप्त करण्याची क्षमता होय. ज्या प्रकारे यश आपल्याला मिळवायचे आहे ते मिळवण्यासाठी काय करायला हवे याबद्दलच्या सूचना आपल्या मनातुन येत असतात. सावध राहून या सूचनांची अंमलबजावणी करणे म्हणजेच आत्मविश्वासपूर्ण वर्तन होय. आत्मविश्वास पूर्ण वर्तन ठेवण्यासाठी आपण कोण आहोत, आपले व्यक्तिमत्व कसे आहे, आपल्यातील गुण दोष काय आहेत. याची पूर्ण ज्ञान आपणास पाहिजे. आत्मज्ञान झाल्यावर आपल्याला प्रगतीचा मार्ग निश्चितच सापडू शकेल. प्रगतीपथावरील पदचिन्हांची आपल्याला चाहूल लागली, आपली बुद्धिमत्ता आपली प्रकृती यांची अचूक ज्ञात झाली की आपण निश्चितच पणे जीवनात यशस्वी होणारच असे समजावे यालाच आत्मविश्वास म्हणतात. ( डॉ.कुलकर्णी राम, व्यक्तिमत्व विकास, राहुल बुक सेंटर, नाशिक, 1995, पान नं 60)

1. "आत्मविश्वास म्हणजे संकल्पनेविषयी आणि स्वतःच्या क्षमते विषयी घटनात्मक अभिवृत्ती होय."
2. बांदुरा (1986) यांच्या मते आत्मविश्वास हा प्रेरणादायक आणि नियमकांपैकी एक मानला जातो. एखाद्या व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील वर्तन होय.

3. शेलार (1998) यांच्या मते विष आत्मविश्वास ही एक व्यक्तीची वैशिष्ट्ये (स्वतःची रचना ) असते. ज्यामुळे एखाद्या व्यक्तीस परिस्थितीत सकारात्मक किंवा वास्तववादी दृष्टिकोन ठेवता येतो.

आत्मविश्वास म्हणजे स्वत: बद्दलचा विश्वास. एखादी गोष्ट करू शकतो हा विश्वास म्हणजे आत्मविश्वास होय.

Self-confidence as faith of own abilities. Dictionary of education -Good (1973)

"आत्मविश्वास म्हणजे संकल्पनेविषयी आणि स्वतःच्या क्षमते विषयी घटनात्मक अभिवृत्ती होय".(http:drashishgurav.ब्लॉगस्पॉट. Com/)

**संशोधनाचे महत्त्व**

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास त्यांच्या शैक्षणिक यशासाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाचा घटक आहे आत्मविश्वास असलेले विद्यार्थी अभ्यासात अधिक कसक्रीय जिज्ञासू, समस्यांचे निराकरण करणारे आणि निर्णयक्षम ठरतात, तर आत्मविश्वासाचा अभाव असलेले विद्यार्थी असुरक्षितता व अपयशाच्या मानसिकतेत अडकतात .हा अभ्यास शिक्षक, पालक आणि शाळेसाठी मार्गदर्शन करणारा आहे, कारण यातून विद्यार्थ्यांच्या क्षमता, गरजा आणि आव्हाने समजून घेता येतात. तसेच, संशोधनाचे निष्कर्ष शैक्षणिक धोरणे, अध्यापन पद्धती व पाठ्यक्रम सुधारणा करण्यासाठी उपयुक्त ठरतात .यामुळे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा अभ्यास शैक्षणिक, सामाजिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**संशोधन समस्या विधान**

नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातील कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा शोध घेणे.

**संशोधन समस्येचे स्पष्टीकरण:**

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी कुमारावस्थेत असतात (वय १२ ते १६ वर्षे), जेव्हा शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक बदल झपाट्याने घडतात या काळात विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास विकसित होणे त्यांच्या .शैक्षणिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते .विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास हा त्यांच्या स्वतःच्या क्षमतांवर, ज्ञानावर आणि कृतीवर असलेला दृढ विश्वास दर्शवतोआत्मविश्वास असलेले विद्यार्थी अभ्यासात अधिक सक्रिय ., जिज्ञासू आणि समस्यांचे निराकरण करणारे ठरतात, तर आत्मविश्वासाचा अभाव असलेले विद्यार्थी असुरक्षितता, भीती आणि अपयशाच्या मानसिकतेत अडकतात या संशोधनाद्वारे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे विविध पैलू – स्वावलंबन, निर्णयक्षमता, संघर्ष सामर्थ्य, शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्याची प्रेरणा–मोजून पाहण्यात आले. या अभ्यासातून शिक्षक, पालक आणि शाळा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी योग्य उपाययोजना करू शकतील, तसेच शैक्षणिक संपादन सुधारण्यास मार्गदर्शन मिळेल.

**संशोधनाची गृहितके**

१) पौगंडावस्था ही संघर्ष आणि तणाव तसेच वादळ आणि विरोधाची अवस्था आहे. कौमार्यवरथेमध्ये समायोजन साधन असतांना बऱ्याच संघर्षमय परिस्थितीत निर्माण होणाऱ्या घटकांचा आपण अभ्यास केल्यास कुमारांच्या गरजा आपल्या लक्षात येतील व त्यांना उपयुक्त मार्गदर्शन करता येईल . (गुल्हाने गजानन व सुत्तरवार श्वेता, डिसें. 2015, बाल्यावस्था व बालविकास, सुविचार प्रथम प्रकाशन मंडळ, पुणे नं. 75)

२) मुलाला एखादी कृती जमली नाही तर त्याचा आत्मविश्वास डाळमळतो. म्हणून मुलाला सुसंगत अशी कौशल्य शिकवणे योग्य ठरते. (डॉ. दत्तात्रय तापकीर प्रा. विजयकुमार पाईकराव डॉ.मनीषा चित्रे, यशवंतराव चव्हाण, अध्ययनार्थी व त्याचा विकास, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, पान.नं.49)

३) मानसशास्त्रीय चाचणी ही व्यक्तींच्या वर्तनाचा अभ्यास करण्यासाठीची I एक शास्त्रशुद्ध पद्धत आहे. (डॉ. अनिता पाटील, मानसशास्त्रीय चाचण्या नोव्हेंबर 2008- प्रथम आवृत्ती, डायमंड पब्लिकेशन, पा.नं.3)

४) मानसशास्त्रीय कसोट्या अथवा चाचण्यांचा शैक्षणिक संशोधनासाठी तसेच मानसशास्त्रातील संशोधनामध्ये वापर करण्यात येतो. (डॉ. नंदिनी पाटील, वैशाली शिंदे, मानसशास्त्रीय कसोट्यांचा वापर व संशोधन, Scholarly , Scholarly research journal for interdisciplinary studies, www. Srjis.com)

**संकल्पनात्मक व्याख्या:**

**१.माध्यमिक स्तर :-**

महाराष्ट्रातील शैक्षणिक पुर्नरचनेनुसार आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या शिफारशीनुसार उच्चप्राथमिक स्तर व उच्च माध्यमिक स्तर यांना जोडणारा दुवा. त्यात इयत्ता ९ वी व १० वी या दोन वर्गांचा समावेश होतो. यावरून इयत्ता ९ वी व १० वी चे वर्ग असणारी शाळा म्हणजे माध्यमिक स्तर .(शैक्षणिक संशोधन मांडणी व दिशा ,डॉ. हेमंत चित्ते )

**2. आत्मविश्वास-**

आत्मविश्वास म्हणजे स्वत: बद्दलचा विश्वास. एखादी गोष्ट करू शकतो हा विश्वास म्हणजे आत्मविश्वास होय.
Self-confidence as faith of own abilities. Dictionary of education -Good (1973)

"आत्मविश्वास म्हणजे संकल्पनेविषयी आणि स्वतःच्या क्षमते विषयी घटनात्मक अभिवृत्ती होय". ( http:drashishgurav.ब्लॉगस्पॉट. Com/)

**संशोधनाची व्याप्ती**

1. प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील मराठी माध्यमाच्या, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (State Board) अभ्यासक्रम अभ्यासणाऱ्या कुमारावस्थेतील सर्व विद्यार्थ्यांशी संबंधित होते.
2. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही मराठी माध्यमातील इयत्ता नववी च्या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाशी निगडित आहे.
3. प्रस्तुत शैक्षणिक संशोधन हे आत्मविश्वासाच्या वाढींशी संबंधित होते.
4. प्रस्तुत शैक्षणिक संशोधनासाठी संशोधिकेने आत्मविश्वास मोजण्यासाठी गाझाला झिया यांनी तयार केलेले आत्मविश्वास मापन स्केल हि माहिती संकलनासाठी वापरली.

**संशोधनाची मर्यादा**

1. प्रस्तुत संशोधन हे मराठी माध्यमाच्या माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष हे मराठी माध्यमाच्या इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादापुरतेच मर्यादित होते.

**संशोधनाची जनसंख्या व नमुना**

**जनसंख्या-**

नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या इयत्ता नववीचे सर्व विद्यार्थी हे प्रस्तुत शैक्षणिक संशोधनाची जनसंख्या होती.

**नमुना-**

नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या शाळांमधून असंभाव्यतेवर आधारित नमुना निवड पद्धतीपैकी सहेतूक नमुना निवड पद्धत वापरली गेली. या

पद्धतीद्वारे वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय, माडसांगवी, नाशिक शाळेतील इयत्ता नववीतील अध्ययन करणारे विद्यार्थी होते.

**संशोधन साधने**

प्रस्तुत शैक्षणिक संशोधनासाठी संशोधिकेने माहिती संकलनासाठी संशोधिकेने आत्मविश्वास मोजण्यासाठी गाझाला झिया यांनी तयार केलेले आत्मविश्वास मापन स्केल माहिती संकलनासाठी वापरली.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा शोध घेणे.

२) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची कार्यपद्धती:**

| उद्दिष्ट क्रमांक | उद्दिष्ट | संशोधन पद्धती | संशोधन साधन | संख्याशास्त्रीय परिणाम | नमुना |
|---|---|---|---|---|---|
| १ | माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा शोध घेणे. | सर्वेक्षण पद्धती | गाझाला झिया यांची आत्मविश्वास मापन साधन | शेकडेवारी | वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय, माडसांगवी ,नाशिक या शाळेतील इयत्ता ९ वी चे अध्ययन करणारे ६० विद्यार्थी. |
| २ | माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा अभ्यास करणे. | सर्वेक्षण पद्धती | गाझाला झिया यांची आत्मविश्वास मापन साधन | शेकडेवारी | |

**माहितीचे विश्लेषण व अर्थानिर्वचन:**

**कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक अभिवृत्तीचा दर्शवणारे कोष्टक:**

| अ.क्र. | वर्गीकरण | टक्केवारी | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | खूपच कमी आत्मविश्वास असणारे विद्यार्थी | ३० % | १८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मध्यम प्रमाणात आत्मविश्वास असणारे विद्यार्थी | ४५ % | २७ |
| ३ | बहुतांश प्रमाणात आत्मविश्वास असणारे विद्यार्थी | २५ % | १५ |

**माहितीच्या आधारे निष्कर्ष:**

1. माझा स्वभाव लोकांना आवडणारा आहे असे मला वाटते यास मी पूर्णपणे सहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ३२ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच ५३.३३ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
2. मला वाटते कि कोणीच मला प्रेम करत नाही, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ३५ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच ५८.३३ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
3. माझ्या क्षमते बाबत मी आत्मविश्वास बाळगतो, यास मी पूर्णपणे सहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी केवळ ३० विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच केवळ ५०% विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
4. मी योग्य वेळी निर्णय घेवू शकत नाही यास मी पूर्णपणे असहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी १५ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच केवळ २५ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
5. मी माझ्या वर्ग मित्रांपेक्षा माझे कौशल्य चांगले दाखवू शकतो , यास मी पूर्णपणे सहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ३७ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच ६१.६६ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
6. कोणीतरी माझ्याकडे पाहत असेल तर मी सर्वोत्तम देवू शकत नाही. यास मी पूर्णपणे सहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ४० विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच ६६.६६ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
7. इतरांशी बोलतांना मी नेहमी डोळ्यांचा संपर्क ठेवतो , यास मी पूर्णपणे असहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ४५ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच ७५.00 विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
8. माझ्या बुद्धिमत्तेवर मला विश्वास आहे. असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ४३ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच ७३.३३ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
9. मला माझ्या मित्रांसोबत राहायला आवडते.यास मी पूर्णपणे असहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ३१ विद्यार्थ्यांनीच दिला आहे , म्हणजेच केवळ ५१.६६ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
10. माझ्या शारीरिक देखाव्याबाबत मी नेहमीच चिंतेत असतो, यास मी पूर्णपणे सहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ३० विद्यार्थ्यांनीच दिला आहे , म्हणजेच केवळ ५० विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
11. मी गोष्टी शांतपणे विश्लेषण करतो , असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ३० विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच केवळ ५० विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
12. माझे मत वर्ग चर्चेत विचारात घेतेले जाणार नाही असे मला वाटते, यास मी पूर्णपणे असहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी १५ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच केवळ २५ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.

13. मी कोणत्याही संभाषणात बोलणारा असतो, ऐकणारा नाही , यास मी पूर्णपणे सहमत आहे, असा योग्य प्रतिसाद आहे ६० पैकी ४२ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, ७० विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
14. मी माझ्या मित्रांपेक्षा कमी हुशार आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी २५ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच ४१.६६ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
15. मी सहज गोष्टी शिकू शकतो. असा योग्य प्रतिसाद ६० पैकी २५ विद्यार्थ्यांनीच दिला आहे, म्हणजेच ४१.६६ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
16. मी निर्भय आहे. असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ५२ विद्यार्थ्यांनीच दिला आहे. म्हणजेच केवळ ८६.६६विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
17. मी लवकर निराश होतो. यास मी पूर्णपणे सहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी १४ विद्यार्थ्यांनीच दिला आहे. म्हणजेच २३.३३ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
18. माझा मेंदू तीव्र आहे, यास मी पूर्णपणे सहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ५५ विद्यार्थ्यांनीच दिला आहे. म्हणजेच ९१.६६ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
19. मला माहित आहे कि लोकांना माझा चेहरा आवडतो, यास मी पूर्णपणे सहमत आहे, असा योग्य प्रतिसाद ६० पैकी ५१ विद्यार्थ्यांनीच दिला आहे. म्हणजेच ८५ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.
20. परीक्षेच्या वेळी मी सामान्य चिंतेत असतो. असा योग्य प्रतिसाद ६० पैकी १४ विद्यार्थ्यांनीच दिला आहे. म्हणजेच २३.३३ विद्यार्थ्यांनीच योग्य प्रतिसाद दिला आहे.

**सर्वसाधारण निष्कर्ष:**

1. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, माझा स्वभाव लोकांना आवडणारा आहे असे मला वाटते.
2. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की मला वाटते कि कोणीच मला प्रेम करत नाही.
3. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की माझ्या क्षमते बाबत मी आत्मविश्वास बाळगतो.
4. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, मी योग्य वेळी निर्णय घेवू शकत नाही.
5. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, मी माझ्या वर्ग मित्रांपेक्षा माझे कौशल्य चांगले दाखवू शकतो.
6. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, कोणीतरी माझ्याकडे पाहत असेल तर मी सर्वोत्तम देवू शकत नाही.
7. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, इतरंशी बोलतांना मी नेहमी डोळ्यांचा संपर्क ठेवतो.
8. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, माझ्या बुद्धिमत्तेवर मला विश्वास आहे.
9. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, मला माझ्या मित्रांसोबत राहायला आवडते.
10. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, माझ्या शारीरिक देखाव्याबाबत मी नेहमीच चिंतेत असतो .

11. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की ,मी गोष्टी शांतपणे विश्लेषण करतो .
12. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, माझे मत वर्ग चर्चेत विचारात घेतेले जाणार नाही असे मला वाटते.
13. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, मी कोणत्याही संभाषणात बोलणारा असतो, ऐकणारा नाही
14. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, मी माझ्या मित्रांपेक्षा कमी हुशार आहे.
15. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, मी सहज गोष्टी शिकू शकतो.
16. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, मी निर्भय आहे.
17. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, मी लवकर निराश होतो.
18. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, माझा मेंदू तीव्र आहे .
19. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, मला माहित आहे कि लोकांना माझा चेहरा आवडतो.
20. कुमारावस्थेतील फारच कमी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे की, परीक्षेच्या वेळी मी सामान्य चिंतेत असतो.

**मराठी संदर्भ सूची**

1. भदाणे, देसले मु. (2011 नोव्हेंबर): शैक्षणिक मुल्यमापन वसंख्याशास्त्र. नाशिक : इनसाइंट पब्लिकेशन
2. भंगाळे, शे. (नोव्हेंबर 2011): बालावस्था व वाढते वय. जळगांव : प्रशांत पब्लिकेशन
3. भिंताडे, वि.रा. (2004): शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नूतन प्रकाशन.
4. चव्हाण वि. मुळे सं.. (2013): शेक्षणिक संशोधनाचा आढावा. द्वितीय आवृत्ती. नाशिक : इनसाइंट पब्लिकेशन
5. चव्हाण कि. (2010): विकास व अध्ययनाचे मानसशास्त्र. नाशिक : इनसाईट पब्लिकशन
6. चित्ते. हेमंत (2015): शेक्षणिक संशोधन मांडणी व दिशा. नाशिक : सात्विक प्रकाशन
7. गुल्हाने गजानन, सत्तुरवार रवी (25) डिसेंबर 2013): बालावस्था व बालविकास (प्रथम आवृत्ती) पुणे सुविचार मंडळ प्रकाशन
8. जोशी. अं. महाले सं (1999): मुक्त विद्यापीठ संशोधन, पुष्प पहिले, नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
9. करंदीकर सु. (जुलै 2007): शैक्षणिक मानसशास्त्र. दुधाळी, कोल्हापूर : फडके प्रकाशन
10. मुळे. रा.शं. व उमाठे, वि.तू. (1998): शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, तृतीय आवृत्ती, ओरंगाबाद महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
11. मोरे (2010). शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान. पिंपळापूरे ॲण्ड के पब्लीशर्स
12. पंडीत. ब (2010) : शिक्षणातील संशोधन. पुणे नित्यनुतन प्रकाशन
13. पाटील. (नोव्हें. 2018): मानसशास्त्रीय चाचण्या. पुणे डायमंड पब्लिकेशन I
14. Anne Anastasi, Susana U. (2006): Psychological Testing, First Impression, Seventh Edition, Borase C.(13 Oct. 2013): Mix Method of Research. Pune: Authors Avenue Publications
15. Garrett, H.E. (2006): Statistics in Psychology & Education. Delhi: Surjeet Publication
16. Beady G.L. Shymla M Kusuma A. (2016): Research Methodology of Statistics in Education,
17. New Delhi: DPH. Discovery Publishing House Pvt.